लोकसत्ता पु. पा. ३०

# बनावट वाहन विम्याद्वारे वाहनचालकांची फसवणूक

### एजंटविरोधात गुन्हा दाखल

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** नामांकित वाहन विमा कंपनीचा बनावट विमा काढून देत वाहनचालकांची फसवणूक केल्याप्रकरणी माणिकपूर पोलिसांनी एका विमा एजंटविरोधात गुन्हा दाखल केला आहे. त्याने नामांकित कंपनीच्या वाहन विम्याच्या कागदपत्रात फेरफार करून हजारो बनावट विमा दिल्याचे उघडकीस आले आहे.

वसईत राहणारे मितेश मोदी यांनी ऑक्टोबर २०२२ मध्ये वाहन विमा एजंट अतुल नागडा याच्यामार्फत त्यांच्या चारचाकी वाहनाचा विमा काढला होता. 'एचडीएफसी अर्गो' या कंपनीतून हा विमा काढण्यात आला होता. फेब्रुवारीत कंपनीने मोदी यांना पत्र पाठवून विम्याची मुदत संपल्याचे कळवले. त्या वेळी विमा काढला असताना मुदत कशी संपली याची चौकशी केल्यानंतर विम्याची कागदपत्रे बनावट असल्याचे समजले.

मोदी यांनी चारचाकी वाहनांचा विमा काढला होता. मात्र, कंपनीच्या अधिकृत विमा कागदपत्रात फेरफार करून दुचाकीचा विमा काढण्यात आला होता. या प्रकरणी मोदी यांनी माणिकपूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून पोलिसांनी अतुल नागडा याच्याविरोधात फसवणूक, कागदपत्रात फेरफार केल्याप्रकरणी विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नागडा याने कंपनीच्या कागदपत्रांत फेरफार करून हजारो विमा काढून नागरिकांची फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले आहे. आरोपीला लवकरच अटक केली जाईल, असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संपतराव पाटील यांनी सांगितले.

# 'फेसबुक'वरील 'कोमल शर्मा'कडून लाखोंचा गंडा

### तिघा जणांविरोधात गुन्हा

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** 'फेसबुक'वर मुलींच्या नावाने रिक्वेस्ट पाठवून नंतर धमकी देत आर्थिक लूट करण्यात येत असल्याच्या घटना वाढत आहेत. नालासोपारा येथील ५९ वर्षीय व्यक्तीला ठकसेनांनी अशीच धमकी देत तीन लाख रुपयांचा गंडा घातला आहे.

फिर्यादी हे निवृत्त असून ते नालासोपारा येथे राहतात. त्यांना कोमल शर्मा नावाच्या मुलीची 'फेसबुक' रिक्वेस्ट आली. तिने फिर्यादी यांना व्हिडिओ कॉल करून अश्लील कृत्य करण्यास भाग पाडले आणि त्या आधारे पाच लाख रुपयांची खंडणी मागितली. ती न दिल्यास फिर्यादी यांचे चित्रण प्रसारित करण्याची धमकी दिली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी फिर्यादी यांना प्रमोद राठोड नावाच्या व्यक्तीचा फोन आला. त्याने आपण पोलीस असल्याचे सांगत प्रकरण न मिटवल्यास अटक करण्याची धमकी दिली. यामुळे फिर्यादी घाबरले व त्यांनी आरोपींनी दिलेल्या अभिषेक कुमार याच्या खात्यावर तीन लाख नऊ हजार रुपये भरले. त्यानंतर त्यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. पोलिसांनी याप्रकरणी कोमल शर्मा, अभिषक कुमार आणि प्रमोद राठोड यांच्याविरोधात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे.

'फेसबुक'वर मुलींच्या नावाने रिक्वेस्ट पाठवून जाळ्यात ओढणारी टोळी सक्रिय आहे. त्यामुळे अनोळखी रिक्वेस्ट स्वीकारू नयेत, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# भोजपुरी अभिनेत्रीकडे खंडणीची मागणी

### चार जणांवर गुन्हा

**वसई :** अश्लील छायाचित्रे प्रसारित करण्याची धमकी देत भोजपुरी अभिनेत्रीकडून १० लाख रुपयांची खंडणी मागणाऱ्या चार जणांविरोधात नायगाव पोलीस ठाण्यात बलात्कार आणि खंडणीचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

फिर्यादी तरुणी २३ वर्षांची असून, ती भोजपुरी चित्रपटात काम करण्यासाठी आली होती. तिची ओळख मनोज उर्फ टिल्लू गुप्ता याच्याशी झाली. तिने नायगाव पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार आरोपी गुप्ता याने भोजपुरी चित्रपटात काम देतो तसेच लग्न करतो, असे आश्वासन दिले होते. २०१८ ते १८ मार्च २०२३ दरम्यान आरोपीने भूलथापा देऊन विविध ठिकाणी शरीरसंबंध प्रस्थापित केले. या काळात काढलेली अश्लील छायाचित्रे प्रसारित करण्याची धमकी देऊन १० लाख रुपयांची मागणी केली.

आरोपी गुप्ता याची आई माधुरी गुप्ता (५५), बहीण साधना गुप्ता (४०) भाऊ प्रमोद गुप्ता (४०) यांनी मारहाण केल्याची तक्रारही तिने दिली आहे. या तक्रारीवरून नायगाव पोलीस ठाण्यात या चौघा आरोपींविरोधात विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

Scanned with CamScanner

म.टा.पु.पा.१.

# गुटखा विक्रेत्यांना 'अभय'?

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

राज्य सरकारने बंदी घातलेल्या गुटख्याची मिरा-भाईंदरमधील दुकाने व पान टपऱ्यांवर खुलेआम विक्री केली जात असल्याचे दिसत आहे. गुटखा विक्रेत्यांवर कारवाई करण्याची जबाबदारी असलेले अन्न व औषध प्रशासन आणि पोलिस मात्र याकडे डोळेझाक करत आहे. त्यामुळे गुटखा विक्रेत्यांना प्रशासनाचे अभय असल्याचे मत व्यक्त होत आहे. एका पोलिस हवालदाराला गुटखा विक्रीसाठी लाच घेताना नुकतीच अटक करण्यात आल्याने हा मुद्दा पुन्हा चर्चेला आला आहे.

## मिरा-भाईंदरमध्ये खुलेआम विक्री



### बेकायदा टपऱ्यांकडे पालिकेचे दुर्लक्ष

मिरा-भाईंदरमध्ये रस्त्याकडेला किंवा दुकानांसमोरील मोकळ्या जागेत सुमारे एक हजार टपऱ्या उभारण्यात आल्याचे सांगितले जाते. या टपऱ्यांच्या संख्येत दिवसागणिक वाढ होत आहे. यातील बहुतांश टपऱ्या बेकायदा असल्या, तरी त्यांच्यावर कारवाई करण्याकडे पालिका दुर्लक्ष करते. धक्कादायक म्हणजे, दूध व इतर उत्पादनांच्या विक्रीसाठी दिलेल्या स्टॉलमध्येही गुटखाविक्री सुरू आहे.

गुटख्याच्या सेवनामुळे कर्करोगासारखे गंभीर आजार होण्याचे प्रमाण वाढत असल्याने, राज्य सरकारने गुटखाबंदीचा निर्णय घेतला. त्याच्या अंमलबजावणीसाठी गुटखाविक्रेत्यांवर कठोर कारवाईची तरतूदही करण्यात आली. हा निर्णय घेऊन अनेक वर्षे उलटली असली, तरी मिरा-भाईंदरमध्ये गुटखा सहज उपलब्ध होत आहे. शहरातील पान टपऱ्यांसह किरकोळ दुकानांवरही खुलेआम गुटख्याची विक्री सुरू असल्याचे दिसत आहे.

भाईंदरच्या नवघर पोलिस ठाण्यातील एका हवालदाराला गुटखाविक्रीसाठी लाच घेताना बुधवारी अटक करण्यात आली आहे. या, प्रकारानंतर मिरा-भाईंदरमधील बेकायदा गुटखाविक्रीचा मुद्दा उपस्थित केला जाऊ लागला आहे. गुटखाविक्रेत्यांवर कारवाईचे अधिकार पोलिसांसह अन्न व औषध प्रशासनाला देण्यात आले आहेत. मात्र खुलेआम गुटखाविक्री होत असली, तरी या यंत्रणांकडून दरमहा केवळ बोटावर मोजण्याइतपत विक्रेत्यांवर कारवाई केली जात आहे.

गुटखा व्यापाऱ्यांकडून पान टपऱ्या व दुकानचालकांना दिवसाला लाखो रुपयांचा गुटखा पुरवला जात आहे. पोलिस ठाण्यालगत असणाऱ्या टपऱ्या व दुकानांचाही यात समावेश आहे. त्यामुळे पोलिसांना आणि अन्न व औषध प्रशासनाला याची माहिती नाही का, की मिरा-भाईंदरला गुटखाबंदीतून वगळले आहे का, असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत. शहरात गुटखा विक्रेत्यांचे मोठे जाळे सक्रिय असल्याचे मत जाणकारांकडून व्यक्त केले जात आहे.

---

लोकमत पु.पा.३.

# आता तहसीलदार, नायब तहसीलदारही संपावर

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे :** महाराष्ट्र राज्य तहसीलदार व नायब तहसीलदार संघटनेच्या नेतृत्वाखाली ठाणे जिल्ह्यातील तहसीलदार आणि नायब तहसीलदार ३ एप्रिलपासून बेमुदत कामबंद आंदोलन छेडण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या पाठोपाठ आता तहसीलदारही संपावर जात असल्यामुळे नागरिकांचे हाल होणार असल्याचे बोलले जात आहे.

नायब तहसीलदार (राजपत्रित) वर्ग - २ पदाची वेतन श्रेणी व ग्रेड पे - चार हजार ८०० करण्याची मागणी होत आहे. दर्जा वर्ग - २ मग वेतनश्रेणी वर्ग - ३ ची का? असे या नायब तहसीलदारांमध्ये बोलले जात आहे. सातत्याने शेतकरी, कष्टकरी, वंचित, मजूर, महिला व ज्येष्ठ नागरिक यांच्या हितासाठी महसूल विभाग सतत कार्यरत आहे.

तहसीलदार व नायब तहसीलदार संघटनेने यापूर्वी १९९८ पासून वारंवार नायब तहसीलदार राजपत्रित वर्ग - २ यांना इतर समकक्ष वर्ग - २ पदाची वेतनश्रेणी लागू करावी, यासाठी निवेदन दिले आहे.

प्रत्यक्ष भेटी घेऊन भूमिका मांडणे, सादरीकरण. करूनही जाणीवपूर्वक संघटनेच्या न्याय मागणीकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप केला जात आहे. त्यामुळे आता बेमुदत कामबंद करण्याचा निर्णय या अधिकाऱ्यांनी घेतला आहे.

Scanned with CamScanner

लोकसत्ता पा. नं. ८.

# छत्रपती संभाजीनगरमध्ये हिंसाचार, गोळीबार

## पोलीस वाहनासह १७ गाड्या जाळल्या

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील किराडपुरा भागात रात्री दोनच्या दरम्यान दोन गटांत झालेल्या हाणामारीचे पर्यावसान हिंसाचारात झाले.

दंगलखोरांनी दगडफेक, पोलिसांच्या गाड्यांची जाळपोळ केल्याने पोलिसांनी हवेत गोळीबार केला तसेच अश्रुधुराचा वापर करत जमावाला पांगवले. यामध्ये तीन जण गंभीर जखमी असून त्यातील एकाची प्रकृती चिंताजनक आहे. दहा पोलीसही जखमी आहेत. या हिंसाचारात १७ गाड्यांची जाळपोळ झाली. रात्रभर अफवा पसरविल्या जात होत्या. पोलिसांनी ४०० ते ५०० जणांवर विविध कलमांन्वये दंगलीचे गुन्हे दाखल केल्याचे पोलीस आयुक्त निखिल गुप्ता यांनी सांगितले.

किराडपुरा भागात रामनवमीची तयारी सुरू असताना दुचाकी स्वारास गाडीचा धक्का लागल्याने वादास सुरुवात झाली. घोषणाबाजी करत तरुणांनी मंदिराजवळील काहींना मारले. हे तरुण औषधी गोळ्यांची नशा करत होते. त्यांनी मारहाण केल्याने सिडको भागातून आलेल्या तरुणांच्या जमावाने पुन्हा हाणामारी केली. या प्रकरणातील आरोपींना समजावून त्यांना घरी पाठवत असताना जमाव वाढत गेला. त्यांनी मग मंदिराच्या भोवताली असणाऱ्या पोलीस गाड्यांवर दगडफेक करण्यास सुरुवात केली. त्यानंतर पोलिसांच्या आठ ते दहा गाड्यांना आग लावली.

दरम्यान ही दंगलच 'एमआयएम'च्या वर्तनामुळे घडल्याचा आरोप सत्ताधारी भाजप आणि शिवसेनेने केला.

### बुलढाण्यातही हाणामारी

जिल्ह्यातील मोताळा येथील एका धार्मिक स्थळासमोर घोषणाबाजी करण्यात आल्याने दोन गटांत तणाव निर्माण झाला. यावेळी झालेल्या हाणामारीत सात जण जखमी झाले. जखमींपैकी एकाची प्रकृती गंभीर आहे. ही घटना २९ मार्च रोजी रात्री उशिरा घडली.

लोकमत ५-पा-३.

# मीरा रोडमध्ये नागरिकांना वाहतूककोंडीतून दिलासा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा रोडचा नयानगर परिसर हा मुस्लीमबहुल वस्तीचा असून, यंदा रमजानच्या सुरुवातीपासूनच पोलिसांनी काही भागात वाहनांना प्रवेश बंद, फेरीवाल्यांना आखून दिलेली शिस्त आदी कारणांनी दरवर्षी होणारी कोंडी दिसत नाही.

वाहतूककोंडी टाळण्याच्या दृष्टीने एन.एच. हायस्कूल सर्कल नाका, निहाल कॉर्नर नाका, निलम पार्क नाका, हैदरी चौक येथे रस्त्यांवर बॅरिकेडींग करून अत्यावश्यक सेवेतील वाहने व दुचाकी वाहने वगळता इतर सर्व वाहनांना प्रवेशास प्रतिबंध केला आहे. २१ एप्रिलपर्यंत दुपारी चार ते रात्री बारा वाजेपर्यंत हे प्रतिबंध लागू असणार असल्याचे अधिसूचनेद्वारे पोलिस उपायुक्त प्रकाश गायकवाड यांनी जाहीर केले आहे.

रिक्षा, चारचाकी व अवजड वाहनांना बंदी घातली असली तरी स्थानिक नागरिकांची गैरसोय होऊ नये, म्हणून वाहने उभी करण्यासाठी एन.एच. स्कूलचे ग्राऊंड, महापालिका सभागृहाचे समोर, शम्स हॉलसमोरील बंद रस्त्यावर व निलम पार्क ते टिपू सुलतान मार्गाकडे रस्त्याच्या दोन्ही बाजूस व्यवस्था पोलिसांनी केली आहे. बंदोबस्तासाठी आठ पोलिस अधिकारी, २३ अंमलदार, चार होमगार्ड, २१ महिला सुरक्षा बल जवान आणि एक दंगल नियंत्रण पथक या परिसरात तैनात आहे.

Scanned with CamScanner

पुण्यनगरी पु-पा-४.

# अनधिकृत आठवडे बाजारांमुळे नागरिक त्रस्त

## पालिकेच्या दप्तरी केवळ ४ आठवडे आणि २४ दैनंदिन बाजाराची नोंद

**नालासोपारा :** वसई-विरार शहरात ठिकठिकाणी अनधिकृतपणे दैनंदिन आणि आठवडे बाजारांमुळे नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात बाजार सुरू असताना पालिकेच्या दफ्तरी केवळ ४ आठवडी आणि २४ दैनंदिन बाजारांना परवानगी आहे. या अनधिकृत बाजारांतून फेरीवाला माफिया दररोज लाखो रुपयांची वसुली करत असून, पालिका कारवाई करत नसल्याने हा त्रास वाढू लागला आहे.

वसई-विरार शहरातील रस्त्यावरच फेरीवाल्यांनी अतिक्रमण केले आहे. मुख्य रस्त्यावर जागा अडवून आठवडी आणि दैनंदिन बाजार भरवले जात आहेत. याचा मनस्ताप नागरिकांना सहन करावा लागत आहे. कोरोना काळानंतर शहरातील फेरीवाले वाढले आणि आठवडी बाजारांचे पेव फुटले. फेरीवाला माफियांकडून शहरात ठिकठिकाणी दैनंदिन आणि आठवडे बाजार भरवण्यात येत आहेत. शहरात अनधिकृत बाजारांचा सुळसुळाट असला तरी केवळ ४ आठवडे आणि २४ दैनंदिन बाजारांना परवानगी आहे. पालिकेने दिलेल्या माहितीनुसार, प्रभाग समीती 'एफ' (धानिव) येथे



एक प्रभाग समिती 'जी' (वालीव) मध्ये १, आणि प्रभाग समिती आय (वसई) मध्ये २ बाजार भरवले जात असल्याची माहिती दिली आहे. याशिवाय केवळ २४ दैनंदिन बाजारांना परवानगी देण्यात आली आहे. पण मुळात वसई-विरार परिसरात अनेक आठवडे बाजार सुरू असताना पालिकेकडे केवळ २८ दैनंदिन आणि ४ आठवडी बाजारांची नोंद असल्याने पालिकासुद्धा या बाजार माफियांना पाठीशी घालत असल्याचा आरोप केला जात आहे.

नालासोपारा पूर्वला आचोळे येथे एव्हरशाईन सिटी, आणि डी मार्टकडे जाणारा रस्ता आहे. या रस्त्यावर ओस्वाल नगरीपासून प्रगती नगरपर्यंत मोठ्या प्रमाणात फेरीवाले वसवण्यात आलेले आहेत. या फेरीवाल्यांमुळे स्थानिकांना अनेक प्रकारच्या त्रासाला सामोरे जावे लागते. बाजाराचा कचरा परिसरात पसरलेला असतो. या बाजारामुळे संध्याकाळच्या वेळेत मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते. याबाबत स्थानिकांनी अनेकदा पालिकेकडे तक्रारी केल्या होत्या. मात्र, अद्याप कारवाई झालेली नाही. शहरात फेरीवाला माफिया तयार झाले असून, ते या फेरीवाल्यांना वसवून त्यांच्याकडून प्रतिदिन लाखो रुपयांची वसुली करत असतात. त्यामध्ये काही माजी नगरसेवकांचाही समावेश आहे. ओस्वाल नगरी येथील आठवडी बाजारात ४०० फेरीवाले बसतात. त्यांच्याकडून प्रति दुकान ३५० रुपये आकारले जातात. शहरातील सर्वच आठवडी बाजार आणि दैनंदिन फेरीवाल्यांकडून दररोज अशाप्रकारे लाखो रुपये वसूल करण्यात येत आहेत.

> ❝ पालिका आठवडे बाजाराच्या बाबतीत आपले धोरण निश्चित करत आहे. ज्या ठिकाणी आठवडे बाजार भरवले जात आहेत. त्यांच्याकडून व्यावसायिक कर वसूल केला जाणार आहे. त्यासाठी बाजारांचे सर्वेक्षण सुरू केले आहे.
>
> अनिलकुमार पवार (आयुक्त, वसई-विरार महापालिका)

> ❝ आपल्या विभागात एकही आठवडा बाजार सुरू नाही. जर कुणी बेकायदेशीररित्या आठवडा बाजार भरवत असेल कारवाई करण्यात येईल.
>
> - विशाखा मोटघरे (सहाय्यक आयुक्त प्रभाग समिती 'ड')

Scanned with CamScanner

सकाळ ५-५-१.

# घरफोडी करणाऱ्यास दहा तासांत अटक

## काशी मिरा पोलिसांची कारवाई; २३ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

भाईंदर, ता. ३० (बातमीदार): रमजान निमित्त घरातील व्यक्ती बाहेर गेल्याची संधी साधून घरातून तब्बल चोवीस लाख रुपयांचा मुद्देमाल चोरून नेणाऱ्या सराईत गुन्हेगाराला काशी मिरा पोलिसांनी अवघ्या दहा तासांत बेड्या ठोकल्या आहेत. त्याच्याकडून सुमारे तेवीस लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपीने आतापर्यंत चाळीसहून अधिक घरफोड्या केल्या असल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे.

काशी मिरा परिसरात राहणारे अकबरअली मोहम्मदअली चुडीहार हे २६ मार्चला रमजानच्या चंद्र दर्शनासाठी मुंबईतील गोरेगाव येथे गेले होते. ही संधी साधून त्यांच्या घराच्या खिडकीचे ग्रील कापून पंधरा लाख रुपये किंमतीचे सोन्याचांदीचे दागिने तसेच नऊ लाख रुपयांची रोख रक्कम असा सुमारे चोवीस लाख रुपयांचा ऐवज चोरण्यात आला होता. चुडीहार यांनी याबाबत काशी मिरा पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवली होती.

पोलिसांनी हा गुन्हा नालासोपारा येथे राहाणाऱ्या अब्दूल शेख ऊर्फ अब्दूल चिरा याने केल्याचे शोधून काढले. आरोपी दुसऱ्या राज्यात पळून जाण्याच्या तयारीत असल्याचे समजताच प्रशांत गांगुर्डे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी नालासोपारा रेल्वे स्थानकात सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले.

### आरोपीवर मुंबई, ठाण्यातही गुन्हे दाखल



आरोपीकडून सात लाख ७५ हजारांची रोख रक्कम तसेच सोन्या चांदीचे दागिने असा २३ लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपीवर ठाणे, मुंबई, पालघर, राजस्थानमधील अजमेर आदी ठिकाणी घरफोडीचे चाळीसहून अधिक गुन्हे दाखल आहेत, अशी माहिती पोलिस उपायुक्त जयंत बजबळे यांनी दिली.

पुण्यनगरी ५-५-१.

# लाच घेताना पोलीस हवालदारासह एकाला अटक

**मीरा रोड :** भाईंदर पूर्वेच्या नवघर पोलीस ठाणे हद्दीत दुकानात गुटखा विक्री करण्यासाठी १० हजार रुपये घेताना पोलीस हवालदार अमित पाटील याच्यासह एका खासगी व्यक्तीला लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांनी अटक केली आहे. तर मध्यस्थी करणारा एक आरोपी फरार आहे.

भाईंदर पूर्वेच्या नवघर विभागात दुकानात गुटखा विक्री करायचा असेल तर पोलिसांना पैसे द्यावे लागत असल्याचे घडलेल्या घटनेवरून दिसून येत आहे. यावरून शहरात शासनाने बंदी घातलेला गुटखा विक्री करणारे सक्रिय झाल्याचे सांगितले जाते. नवघर पोलीस ठाणे हद्दीत एका दुकानात गुटखा विक्री करण्यासाठी पोलीस हवालदाराने महिन्याला ८ हजार रुपये हप्ता मागितला होता. मागील महिना व चालू महिन्याचे असे मिळून १६ हजार रुपये दुकानदाराकडे मध्यस्थ तरुणांद्वारे मागितले; परंतु दुकानदाराने एवढे पैसे देता येणार नाही, असे सांगून १० हजार रुपये देण्याचे कबूल केले. तक्रार करणाऱ्याचा भाऊ यापूर्वीदेखील गुटखा विक्री करताना पकडला असल्यामुळे त्याच्यावर गुन्हा दाखल असून तो जेलमध्ये जाऊन आला आहे. तक्रारदाराला लाच द्यायची नसल्यामुळे त्याने लाच मागत असल्याबाबत ठाणे लाचलुचपत विभागाकडे तक्रार केली होती. लाचलुचपत विभागाने त्याची पडताळणी करून बुधवारी दुपारी सापळा रचून लाच स्वीकारताना पोलिसांचे खबरी खासगी व्यक्ती अमित मिश्रा व पोलीस हवालदार अमित पाटील यांना रंगेहाथ अटक केली आहे. तर मध्यस्थी करणारा संजय यादव फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

Scanned with CamScanner

पुढारी पा. नं. ४.

# महाराष्ट्रात धमक्यांचे पीक; पोलिसांची तारांबळ

## भाजप, काँग्रेस, ठाकरे गट, मनसे एवढेच नव्हे तर बॉलीवूड कलाकारांनाही धमक्या

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्रात सध्या धमक्यांचे पीक आले आहे. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या घराबाहेर बॉम्ब लावला असल्याची धमकी पोलिस कंट्रोल रूमला फोन करून देण्यात आली होती. त्यापूर्वी मनसे, काँग्रेस, ठाकरे गट एवढेच नव्हे तर बॉलिवूड कलाकारांनाही धमकी देण्यात आली.

**नितीन गडकरी यांनाही धमकी**

दोन महिन्यांपूर्वी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या कार्यालयात धमकीचा फोन आला होता. एक दोन नव्हे तर चक्क तीन वेळा हे धमकीचे फोन आले होते. यावेळी चक्क १० कोटी रुपयांच्या खंडणीची मागणी करण्यात आली होती. त्यामुळे पोलिस यंत्रणा सतर्क झाली होती. या प्रकरणी पोलिसांनी जयेश पुजारीला बेळगाव येथून अटक केली. विशेष म्हणजे तो बेळगावच्या तुरुंगात जन्मठेपेची शिक्षा भोगत होता.

**गृहमंत्र्यांच्या घरासमोर बॉम्ब ठेवल्याची धमकी**

नागपूरपासून सुमारे ३० किलोमीटर दूर असलेल्या कन्हान या गावातून एका व्यक्तीला अटक करण्यात आली आहे. वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने त्याने गृहमंत्र्यांच्या नागपूर येथील घरासमोर बॉम्ब ठेवल्याची धमकी नागपूर पोलीस कंट्रोलला दिली होती.

**माझा मेटे होणार : चव्हाण**

सध्या माझ्यावर पाळत ठेवली जात आहे. मी कुठे जातोय, गाडीने कुठे गेलो, कुणाला भेटलो, यावर पाळत ठेवली जात आहे. माझाही विनायक मेटे करण्याची चर्चा सुरू आहे, असे खळबळजनक विधान माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी केले होते. त्यानंतर त्यांच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली होती.



● सलमान खान यालाही गेल्या काही महिन्यांमध्ये जीवे मारण्याच्या धमक्या मिळाल्या आहेत. गोल्डी ब्रारच्या टोळीने ही धमकी दिल्याचे समोर आले होते. त्यानंतर सलमानच्या घरासमोर कडेकोट पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.



### संजय राऊत यांची सुरक्षा वाढवली

● खासदार संजय राऊत यांना आलेल्या धमकीच्या पत्रानंतर त्यांच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे. धमकी मिळाल्यानंतर त्यांनी थेट मुंबई पोलीस आयुक्त आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिले होते. त्यात त्यांनी श्रीकांत शिंदे यांच्यावर आरोप केले होते.

### मनसे नेते अविनाश जाधव यांना धमकी

● मनसेचे नेते आणि मनसे ठाणे जिल्हा अध्यक्ष अविनाश जाधव यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. मुंब्रा डोंगरावर असलेला अनधिकृत दर्गा आणि मशिदीच्या विरोधात आवाज उठवल्याने अविनाश जाधव यांना धमकी मिळाल्याचा दावा मनसेने केला होता.

### संदीप देशपांडे यांच्यावर हल्ला

● मनसेचे नेते संदीप देशपांडे यांच्यावर शिवाजी पार्कमध्ये सकाळच्या सुमारास क्रिकेटच्या स्टंपने हल्ला करण्यात आला होता. या प्रकरणी पोलिसांनी ठाण्यातून तीन तर भांडूप येथून दोन जणांना अटक केली होती. परंतु, अजूनही या हल्ल्याचे खरे सूत्रधार सापडलेले नाहीत.

### अमृता फडणवीस ब्लॅकमेल प्रकरण

● अमृता फडणवीस यांना ब्लॅकमेल केल्याप्रकरणी अनिक्षा जयसिंघानी आणि तिच्या बुकी वडिलांना अटक करण्यात आली होती. अमृता फडणवीस यांनी या प्रकरणी पोलिस तक्रार दिल्यानंतर एकानंतर एक स्फोटक माहिती समोर आली होती.

### आव्हाडांच्या हत्येची सुपारी

● राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड यांच्यासह कुटुंबीयांच्या हत्येची सुपारी देण्यात आल्याची कथित ऑडियो क्लिप व्हायरल झाली होती. त्यानंतर राष्ट्रवादीच्या नेत्यांनी ठाणे महापालिकेचे प्रभारी सहाय्यक आयुक्त महेश आहेर यांना मारहाण केली होती.

पुढारी पु.पा.४.

# मिरा-भाईंदरमध्ये ऑनलाईन लॉटरीचा धुमाकूळ

## पोलिसांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोप

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

राज्य शासनाने बंदी घातलेल्या ऑनलाईन लॉटरीचा गोरखधंदा मिरा-भाईंदर शहरात पुन्हा सुरु झाला असून या अवैध धंद्याने शहरात सध्या धुमाकूळ घातला आहे. मात्र याकडे पोलिसांचा हेतुपुरस्सर कानाडोळा होत असल्याचा आरोप लॉटरी सुरु असलेल्या परिसरातील लोकांनी केला आहे.

राज्य शासनाने गुटखा विक्रीला बंदी घातली असतानाही शहरात मोठ्याप्रमाणात गुटखा विकला जात असल्याचे अनेकदा पोलिसांच्या कारवाईतून उघड झाले आहे. तर या गुटखा विक्रीमागे पोलिसच असल्याची धक्कादायक बाब नवघर पोलीस ठाण्यातील एका कर्मचाऱ्याला ठाणे लाचलुचपत विभागाने गुरुवारी अटक केल्यामुळे समोर आले आहे. गुटखा विक्री करण्यासाठी हप्त्याची मागणी केल्याने पोलिसांकडून गुटख्यावर होणाऱ्या कारवाईवर संशयाचे वलय निर्माण झाले आहे. त्यातच आता राज्यात बंदी असलेल्या ऑनलाईन लॉटरीचे पेव शहरात फुटले आहे.

पूर्वी राजश्री, लोटो वा प्ले विन या ऑनलाईन लॉटरी शहरात जोरात चालत होत्या. त्यात अनेकांचे संसार उध्वस्त झाल्याची प्रकरणे शहरात घडली आहेत. आता राजश्रीचे नामांतर करून श्री तर लोटो वा प्ले विन चे नामांतर करून लॉटो नावाने ऑनलाईन लॉटरीचा गोरखधंदा सुरु झाला आहे. अनेकजण ऑनलाईन लॉटरीच्या नावाखाली मटका देखील चालवित असल्याचे बोलले जात असून समाजासाठी आर्थिकदृष्ट्या घातक ठरणाऱ्या या गोरखधंद्याकडे मात्र पोलिसांचा हेतुपुरस्सर कानाडोळा होत जात असल्याचा आरोप लोकांकडून होऊ लागला आहे.

### अवैध व्यवसाय बंद करण्याची मागणी

**पोलिसांनी तात्काळ राज्यात बंदी असलेल्या ऑनलाईन लॉटऱ्यांचा अवैध व्यवसाय बंद करून लोकांचे भविष्यात उध्वस्त होणारे संसार वाचवावेत, अशी मागणी लोकांनी केली आहे. अन्यथा मागील काळात ठाणे येथील एका बड्या पोलीस अधिकाऱ्याच्या आशीर्वादाने सुरु झालेल्या या अवैध व्यवसायाला मिरा-भाईंदर शहरातही पाय पसरायला वेळ लागणार नाही, अशी भिती लोकांनी व्यक्त केली आहे. तसेच पालिका आयुक्त दिलीप ढोले यांनी या अवैध व्यवसायाच्या ठिकाणावर विना परवान्याच्या नावाखाली कारवाई करून ते बंद पाडावेत, अशी मागणी देखील लोकांकडून होऊ लागली आहे.**



पुढारी पा-नं.७.

# पोलीस शिपाई पदाची लेखी परीक्षा दोन एप्रिलला होणार

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तलयाअंतर्गत पोलीस शिपाई व चालक पदांसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी पोलीस शिपाई चालक पदाची लेखी परीक्षा २६ मार्चला घेण्यात आली असून २ एप्रिलला पोलीस शिपाई पदांसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी परिक्षा सुभाष चंद्र बोस मैदान व स्वर्गीय बाळा साहेब ठाकरे मैदान या ठिकाणी घेण्यात येणार असल्याची माहिती पोलीस आयुक्तलयाकडून देण्यात आली आहे.

मिरा-भाईदर, वसई विरार पोलीस आयुक्तलयअंतर्गत पोलीस शिपाई व चालक पदांसाठी २ जानेवारीला भरती प्रक्रियेला सुरुवात झाली होती. मुला-मुलींची शारीरिक चाचणी पूर्ण झाली आहे. पोलीस आयुक्तालयामध्ये ९९६ पदांच्या जागासाठी ही भरती प्रक्रिया राबवली जात आहे. या पदांसाठी सुमारे ७१ हजार अर्ज प्राप्त झाले होते. यामध्ये ३५,९५६ उमेदवार पात्र ठरले. त्यानंतर लेखी परीक्षेसाठी १२,१२७ पात्र उमेदवार असून त्यापैकी ३,२६९ महिला व ८८५८ पुरुष आहेत. स्वर्गीय बाळा साहेब ठाकरे मैदान याठिकाणी महिलांची लेखी परिक्षा घेण्यात येणार असून पुरुषांची लेखी परिक्षा सुभाष चंद्र बोस मैदान येथे घेण्यात येणार आहे.

या लेखी परीक्षेसाठी मिरा भाईंदर महापालिकेने भाईंदर पश्चिम सुभाषचंद्र बोस मैदान, भाईंदर पूर्व स्व. बाळासाहेब ठाकरे मैदान तसेच आरक्षण क्र. २२० मधील जागा विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

या लेखी परीक्षेसाठी येणाऱ्या महिला उमेदवारांपैकी ज्या महिलांना १ एप्रिल रोजी राहण्याची सोय उपलब्ध होऊ शकत नाही अशा महिलांना महापालिकेकडून स्व. प्रमोद महाजन सभागृह, स्व. मिनाताई ठाकरे सभागृह, आप्पासाहेब धर्माधिकारी सभागृह येथे राहण्यासाठी विनामुल्य सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

पुढारी पु-पा-२.

# खासगी शिकवणी वर्गाच्या वादातून तिघांना मारहाण

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

भाईंदर पूर्वेला एका खासगी खाजगी शिकवणी वर्गाच्या वादातून एका शिक्षकासह इतर दोघांना बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी नवघर पोलिस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भाईंदर पूर्वेच्या नवघर परिसरात पंकज सिंग हे विवेक राय व त्यांचा भाऊ भुरणेंद्र यांच्यासोबत गेल्या काही वर्षांपासून एक खासगी शिकवणी वर्ग चालवत होते. कोरोना काळामध्ये बऱ्याच दिवस शिकवणी वर्ग बंद असल्यामुळे या तीन भागीदारामध्ये आर्थिक व्यवहारावरून वाद झाला. हा वाद न्यायालयात गेल्याने हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

न्यायालयात शिकवणी वर्गाचे फोटो सादर करावयाचे असल्याने ते फोटो व चित्रीकरण करण्यासाठी सिंग हे आपला भाऊ व मित्रासह काही दिवसांपूर्वी शिकवणी वर्गाच्या ठिकाणी गेले होते. चित्रीकरण करत असताना वाद निर्माण झाला त्यावेळी या तिघांना विवेक राय व त्यांचा भाऊ भुरणेंद्र यांनी मारहाण केली. या मारहाणीत सिंग हे गंभीर जखमी झाल्याने त्यांना रुग्णालयात दाखल केले होते. सिंग यांचे भागीदार असलेल्या राय बंधू यांच्याविरोधात नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणाचा पुढील तपास नवघर पोलीस करत आहेत.

Scanned with CamScanner

# काशिमीरा पुलिस को मिली सफलता ; चोरी कर फरार शातिर चोर नालासोपारा से धर दबोचा गया

अजहर शेख : संवाददाता

*वसई ;* घरफोडी चोरी करने वाला शातिर चोर को काशिमीरा पुलिस स्टेशन की क्राइम डिटेक्शन टीम ने १० घंटे के अंदर खोजकर २३ लाख से अधिक का माल जप्त करने में सफलता अर्जित की है। यह कार्रवाई सी.पी मधुकर पांडेय व अतिरिक्त पुलिस कमिश्नर श्रीकांत पाठक के आदेशानुसार परिमंडल १ डीसीपी जयंत बजबले व एसीपी विलास सनाप के मार्गदर्शन में पी.आई संदीप कदम व क्राइम पी.आई विजय पवार की टीम ने की है। यह जानकारी पुलिस अधिकारी ने बुधवार को दी है, पुलिस ने बताया कि शिकायतकर्ता अकबर अली मोहम्मदअली चुडीहार, निवासी-बि.नं.६,डी.बी. ओझोन ठाकुर मॉल के पास, काशिमीरा, मिरारोड पुर्व में रहता है। २३ मार्च व २६ मार्च के दरम्यान शिकायतकर्ता अकबर रमजान के मौके पर चंद्र दर्शन के लिए मुंबई के गोरेगांव गया था, तभी अज्ञात चोर ने घर की खिड़की ग्रिल को काटकर, घर में घुसकर घर में रखा लकड़ी और लोहे की अलमारी से कुल २९३ ग्राम वजन (१४,६५,००० रुपये) सोने के आभूषण, एक किलो वजन



७०,००० रुपये चांदी का आभूषण व ०९,००,००० रुपये नगदी चोरी कर फरार हो गए। इस मामले में अकबर ने काशिमीरा थाने में अज्ञात चोर के खिलाफ एफआईआर दर्ज करवाया।पुलिस अधिकारी ने कहा कि, उक्त अपराध में अज्ञात अभियुक्तों का पता लगाकर अपराध का पर्दाफाश करने के संबंध में वरिष्ठ पी.आई संदीप कदम ने क्राइम डिटेक्शन टीम में एपीआई प्रशांत गांगुर्डे को आदेश दिया, उक्त अपराध में अभियुक्तों की अपराध प्रक्रिया से ऐसे अपराध करने वाले अपराधियों के बारे में जानकारी प्राप्त हुई, गुप्त प्राप्त सूचना के आधार पर आरोपी अब्दुल शेख ऊर्फ अब्दुल चिरा,(उम्र ४६ वर्ष, रा.रुम नं २११, आदर्श निवास, अलकापुरी, आचोला क्रॉस रोड, नालासोपारा) ने उक्त अपराध किया है, पुलिस ने कहा कि, वह एक राज्य में भागने के लिए तैयार था, एपीआई प्रशांत गांगुर्डे और उनकी टीम ने नालासोपारा रेलवे स्टेशन क्षेत्र में जाल बिछाया और आरोपी को गिरफ्तार कर लिया। पुलिस ने बताया कि उक्त गिरफ्तार आरोपी के पास से मौके पर ही अपराध की चोरी की राशि में से ०७,७५,७००/- नकद बरामद किया गया,साथ ही, जांच के दौरान १४,६५,०००/- रुपये मूल्य के २९३ ग्राम सोने के आभूषण और ७०,०००/- रुपये मूल्य के ८५० ग्राम चांदी के आभूषण भी चोरी का माल, यानी कुल मिलाकर २३,१०,००० रुपये का माल जब्त किया गया है। उपरोक्त आरोपी ऑन रिकॉर्ड आरोपी है और उसके विरुद्ध मुंबई, ठाणे, पालघर, अजमेर राज्य-राजस्थान क्षेत्र में चोरी के ४० से अधिक मामले दर्ज हैं, अपराध किए जाने के समय, आरोपी ने बिना कोई तकनीकी या भौतिक साक्ष्य छोड़े अपराध किया था, लेकिन अपराध करने के तौर-तरीकों का अवलोकन किया था। गुप्त मुखबिर से मिली सूचना के आधार पर काशिमीरा थाने की क्राइम डिटेक्शन टीम के अधिकारियों व कर्मचारियों ने मामला दर्ज होने के महज १० घंटे के भीतर ही आरोपी को गिरफ्तार कर लिया है।

Scanned with CamScanner

पुढारी

# मुंबई, ठाणे, कोकणातील तरुणांना पोलीस भरतीचे आमिष

## तोतया पोलिसासह दोघांना मुंबई पोलिसांनी ठोकल्या बेड्या

ठाणे : संतोष बिचकुले

पोलीस भरतीसाठी इच्छुक असलेल्या मुंबई, ठाणे, कोकणातील ५ तरुणांना नोकरीचे आमिष दाखून पैसे उकळणाऱ्या तोतया पोलीस अधिकाऱ्यासह दोघांना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. सदर कारवाई मुंबईच्या आर.ए.के. मार्ग पोलिसांनी केली. सनी भावेकर (४९), अब्दुल शेख (५३) अशी आरोपींची नावे आहेत. या आरोपींना न्यायालयाने १ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावल्याचे पोलीस सूत्रांनी दै. 'पुढारी'ला सांगितले.

### खाकी वर्दी, लोगो जप्त

**या गुन्ह्यातील आरोपी सनी भावेकर याने मुंबई पोलीस दलाचे बोगस ओळखपत्र बनवले होते. सदर ओळखपत्र दाखवून खाकी वर्दीही शिवून घेतली होती. तसेच मोटारसायकलवर पोलीस खात्याचा लोगो चिटकवला होता.**



भोईवाडा वाहतूक विभागाचे हवालदार प्रवीण महाले हे वडाळा परिसरात कर्तव्याला असताना त्यांनी एका मोटारसायकल चालकाला अडवले. त्याची चौकशी केली असता त्याने मुंबई पोलीस खात्यात पोलीस उपनिरीक्षक असल्याचे ओळखपत्र दाखवले. सदर ओळखपत्र बोगस असल्याचे लक्षात येताच महाले यांनी अब्दुल शेखला आर. ए. के. मार्ग पोलीस ठाण्यात नेले. पोलिसांनी त्याची कसून चौकशी केली असता त्याने ओळखपत्र देणाऱ्या सनी भावेकर याची माहिती दिली. त्या माहितीच्या आधारे उपायुक्त डॉ. प्रवीण मुंढे, एसीपी संजय जगताप, वपोनि कुमुद कदम यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि अण्णासाहेब गादेकर, पोउपनि पल्लवी कोळेकर, अंमलदार प्रमोद कर्णे, समिकांत म्हात्रे, स्वप्नील कातुरे, प्रियंका जाधव यांनी सापळा लावून सनी भावेकर याच्या मुसक्या आवळल्या. सनी याने मुंबई, ठाणे, कोकणातील तरुणांना पोलीस खात्यात नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवले असून या तरुणांपैकी एकाकडून ५ हजार रुपये घेतल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. अशा प्रकारे कोणाची फसवणूक झाली असल्यास संपर्क साधावा, असे आवाहन आर. ए. के. मार्ग पोलिसांनी केले आहे.

Thane Edition
Mar 31, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

Scanned with CamScanner

# महिलांच्या सुरक्षेसाठी नायगाव पोलीस सज्ज

नायगाव - नायगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत महिलांच्या बाबतीत बलात्कार, खून, छेडछाड अशा प्रकारचे अनुचित प्रकार घडू नयेत, यासाठी नायगाव पोलीस महिलांच्या सुरक्षेसाठी सज्ज झाले आहेत. नायगाव पोलीस ठाण्याचे निर्माण मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयांतर्गत नागरिकांच्या सुरक्षेत वाढ व्हावी या दृष्टिकोनातून करण्यात आले आहे. महिलांवर अत्याचार करणाऱ्या व्यक्तीला शिक्षा होणारच, असे ठामपणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रमेश भामे यांनी सांगितले.

नायगाव पोलीस ठाण्याची सुरुवात झाल्यापासून जवळपास २ महिलांवर बलात्कार झाल्याचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. नायगाव परिसरात मोठ्या प्रमाणात मोकळी जागा असल्याने व चित्रीकरण करण्याकरता योग्य ठिकाण असल्याने बऱ्याचदा त्याठिकाणी कार्यक्रम, सिनेमा, वेब सिरीज यांचे चित्रीकरण केले जाते. नायगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत जवळपास ५ शूटिंगचे स्टुडिओ आहेत; मात्र याठिकाणी सिनेमा किंवा इतर जाहिरातीत काम करणाऱ्या महिला/मुलींसोबत गैरप्रकार केले जातात. त्यामुळे नायगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत जो कोणी व्यक्ती महिलांच्या असुरक्षेसाठी कारणीभूत ठरेल त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. चित्रीकरण करण्यासाठी पोलिसांनी दिलेल्या सर्व अटी-शर्ती मान्य असतील, तरच परवानगी दिली जाणार आहे. याच बरोबर ज्या ठिकाणी शूटिंग सुरू असेल, त्या ठिकाणी स्वत: पोलीस जाऊन महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने व्यवस्था आहे का, याची तपासणी करणार आहेत. महिलांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये व त्यांना मदत करण्याचा प्रयत्न पोलीस करणार असल्याचे नायगाव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रमेश भामे यांनी सांगितले आहे. नव्याने निर्माण केलेल्या नायगाव पोलीस ठाण्याचे पोलीस महासंचालक रजनिश सेठ यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले आहे. पोलीस ठाण्याची निर्मिती होताच आठवड्याभरात १० गुन्हे दाखल झाले असून, त्यापैकी जवळपास ४ गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश प्राप्त झाले आहे. नायगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत दाखल असलेल्या गुन्ह्यांमध्ये अधिकतर गुन्हे हे बलात्कार, चोरी, प्रॉपर्टी वाद-विवाद, भांडण यांचे आहेत. नायगाव अजून विकसित होत असून, अनेक ठिकाणी मोकळा परिसर असल्याने रात्रीच्या अंधारात कोणताही अनुचित प्रकार घडू नये याकरिता पोलीस प्रयत्न करत आहेत.

Scanned with CamScanner

NBT
नवभारत टाइम्स

## विरार ट्रैफिक पुलिस ने की बड़ी कार्रवाई

# नियमों का उल्लंघन करने वालों से वसूले लाखों

■ निसं, विरार: मीरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालय के ट्रैफिक जोन-3 विरार ने यातायात के नियमों का उल्लंघन करने वाले वाहन चालकों से लाखों रुपये जुर्माना वसूला है। 1 जनवरी से 29 मार्च 2023 तक 12 हजार मामले दर्ज करते हुए 74,55,000 रुपये दंड वसूला गया है। 2022 में 44,496 वाहन चालकों पर कार्रवाई करते हुए सवा 2 करोड़ रुपये के अधिक दंड वसूला गया था।

विरार (पूर्व) मनवेल पाडा रोड पर सालों से बसों की पार्किंग हो रही है। मुंबई के दूसरे उपनगरों से यहां बसें आकर पार्क होती है। लेकिन, यहां पुलिस की कार्रवाई नहीं होती। बस ड्राइवर और अन्य स्टाफ भी यहीं मौजूद रहता है और रात को शराब पीकर ये लोग हंगामा करते है। इससे आस-पास सोसायटीज में रहने वालों को दिक्कत होती है। पुलिस निरीक्षक निरीक्षक प्रशांत लांगी के पदभार संभालते ही अब इन बस चालकों पर कार्रवाई शुरू हुई है। 1 जनवरी से 29 मार्च तक 80 बस चालकों पर कार्रवाई करते हुए 81 हजार रुपये का जुर्माना वसूला गया है।

**अवैध ठेलेवालों को नोटिस :** विरार फाटा से विरार रेलवे स्टेशन जाने वाली मुख्य सड़क पर ट्रैफिक जाम रहता है। यह ट्रैफिक सड़क किनारे खड़े ठेलेवालों की वजह से लगता है। 70 से अधिक अवैध ठेलेवालों को पुलिस ने नोटिस दिया है। साथ ही, मनपा आयुक्त अनिल कुमार पवार को पत्र देकर कार्रवाई की मांग की है।

## अवैध फेरीवालों पर कार्रवाई नहीं

पूर्व नगरसेवक राज कुमार चोरगे ने बताया कि ट्रैफिक पुलिस सिर्फ सड़कों पर वाहनों को हटाने का काम कर सकती है, लेकिन अवैध स्टॉल्स व ठेले हटाने की जिम्मेदारी मनपा की है। लेकिन मनपा उन पर कोई कार्रवाई नहीं करती है।



## वर्दी नहीं, तो की गई कार्रवाई

निसं, नालासोपारा: ट्रैफिक पुलिस ने गुरुवार को नालासोपारा (पूर्व) तुलिंज पुलिस स्टेशन के सामने बिना वर्दी वाले रिक्शा चालकों पर कार्रवाई की है। 30 से अधिक रिक्शा चालक बिना वर्दी के पकड़े गए। पुलिस ने जुर्माना न भरने पर चार रिक्शा जब्त किए है। यह कार्रवाई सहायक पुलिस निरीक्षक विनोद जाधव के नेतृत्व में की गई। नालासोपारा (पूर्व) तुलिंज पुलिस स्टेशन के सहायक पुलिस निरीक्षक विनोद जाधव ने बताया कि बिना वर्दी के पहली बार पकड़े जाने पर 5 सौ, दूसरी बार एक हजार व तीसरी बार पकड़े जाने पर 15 सौ रुपये जुर्माना लगाया जाता है।

वसई-विरार



## नो पार्किंग पर शिकंजा

ट्रैफिक विभाग जोन-3 ने नालासोपारा (पश्चिम), विरार, अर्नाला, विरार (पूर्व) व वसई फाटा आदि जगहों पर नो पार्किंग में वाहन पार्क करने वाले 6,844 वाहन चालकों पर कार्रवाई की है। इनसे 37,09,000 रुपये जुर्माना वसूला गया है। इसके अलावा, बिना परमिशन के ऑटो चलाने वाले 74 ऑटो चालकों से 7 लाख 40 हजार रुपये वसूले गए है।

Scanned with CamScanner

लोकमत

### प्रेमिकांनो सावधान, तुम्हीही ठरू शकाल शिकार

# वसईत निर्जनस्थळांवर प्रेमीयुगुले ठरताहेत 'सॉफ्ट टार्गेट'

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** वसई-विरार परिसरात सागरकिनारे, डोंगर आदी निर्जनस्थळांवर असंख्य प्रेमीयुगुले जात असतात. प्रेमीयुगुलांना एकमेकांच्या बाहुपाशांत वेळेचेही भान राहात नाही. विरारमध्ये अलीकडेच घडलेल्या घटनेतून हेच सिद्ध झालेले असून प्रेमीयुगुलांनी यापासून धडा घ्यायला हवा, असे मत स्थानिकांकडून व्यक्त होत आहे.

एकांतवास शोधण्यासाठी प्रेमीयुगुले शहरालगतच्या निर्जनस्थळी धाव घेत आहेत. मात्र या निर्जनस्थळांवर काही नराधमांकडून ती टार्गेट केली जात आहेत. या निर्जन स्थळांवर काहीजण टार्गेट होत असून, तरुण-तरुणींच्या मौल्यवान वस्तूंसह त्यांच्या अब्रूवरही हात टाकला जात आहे. बऱ्याच वेळा नाहक बदनामी होईल म्हणून तक्रारसुद्धा दिली जात नाही. त्यानंतरही एखादी घटना उघडकीस आलीच, तर तक्रारीसाठी काही जण पुढे येतात. असाच एक प्रकार २३ मार्चला संध्याकाळी विरारच्या पाचपायरी येथील जंगलातील निर्जनस्थळी घडला होता. त्यामुळे यातून बोध घेऊन भटकणाऱ्या प्रेमीयुगुलांनी सावधान न राहिल्यास विरारच्या सामूहिक अत्याचाराच्या घटनेची पुनरावृत्ती होऊ शकते.

१९ वर्षीय तरुणी व २१ वर्षीय प्रियकर डोंगरावरील झाडाझुडपांमध्ये एकांतात रमले होते. त्यावेळी दोन आरोपींनी प्रेमीयुगुलाचे मोबाइलमध्ये फोटो काढले व ते फोटो दाखवून पैशांची मागणी करत पैसे न दिल्यास सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी दिली होती. बदनामी होऊ नये म्हणून पीडित तरुणीच्या प्रियकराने आपल्या मित्राकडून फोन पेद्वारे ५०० रूपये पाठवले होते. दोन्ही आरोपींनी पीडित तरुणीच्या गळ्यातून सोन्याचे पेंडल खेचून पळून गेले होते. दोघेही ते सोन्याचे पेंडल विकण्यासाठी गेले, पण कोणीही ते विकत घेतले नाही. म्हणून दोन्ही आरोपी परत प्रियकर-प्रेयसी बसलेल्या ठिकाणी गेले. यावेळी धीरज राजेश सोनी (२५) आणि यश शिंदे (२२) या दोन्ही नराधमांनी प्रियकराला नग्न करून मारहाण करत झाडाला हातपाय बांधून त्याच्या डोळ्यादेखत नैसर्गिक, अनैसर्गिक बलात्कार केला. त्यावेळी प्रियकराने बाजूला पडलेली काचेची बॉटल एका आरोपीच्या डोक्यावर मारली होती. यानंतर जखमी अवस्थेतील आरोपी व दुसरा आरोपी घटनास्थळावरून पळून गेले होते.

## डॉक्टरमुळे सापडले आरोपी

- घडलेल्या घटनेची माहिती विरार पोलिसांना मिळाल्यावर घटनास्थळी पोहोचले. एक आरोपी जखमी झाल्याने जवळच्या डॉक्टरकडे उपचारासाठी गेला असेल असा पोलिसांना संशय होता.
- पोलिसांनी व्हॉट्सअ‍ॅपच्या ग्रुपवर ही माहिती टाकल्यावर एका डॉक्टरांनी असा आरोपी उपचार घेत असल्याची माहिती पोलिसांना दिली.
- तेथे जाऊन विरार पोलिसांनी दोन्ही आरोपींना ताब्यात घेऊन अटक केली होती. अशा घटना इतर कुणाच्या बाबतीत घडू नयेत, यासाठी प्रेमीयुगुलांनी काळजी घेणे गरजेचे आहे.



Hello Vasai
Page No. 1 Mar 31, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner